RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ८(३)] मंगळवार, जानेवारी १७, २०२३/पौष २७, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जानेवारी २०२३.

### अधिसूचना

**मोटार वाहन अधिनियम, १९८८.**

क्रमांक एमव्हीआर ०३२१/प्र.क्र.४१ /परि-२.—ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाने अधिसूचना क्रमांक जीएसआर ६५३ (ई) दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ अन्वये मोटार वाहन (वाहन स्क्रॅपींग सुविधेचे नोंदणी आणि कार्ये) नियमावली, २०२१ लागू केली आहे;

आणि ज्याअर्थी, मोटार वाहन (वाहन स्क्रॅपींग सुविधेचे नोंदणी आणि कार्ये) नियमावली, २०२१ च्या नियम ३(१) अन्वये परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना नोंदणी प्राधिकारी व परिवहन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करणे उचित वाटत आहे;

आणि त्याअर्थी, मोटार वाहन (वाहन स्क्रॅपींग सुविधेचे नोंदणी आणि कार्ये) नियमावली, २०२१ च्या नियम ३(१)(एल) अंतर्गत प्रदत्त अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना नोंदणी प्राधिकारी म्हणून, आणि सदर नियमाच्या ३(१)(बी) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, परिवहन विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना **राजपत्रात** प्रदर्शित होण्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र होळकर,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032 dated the 17th January 2023.

*NOTIFICATION*

Motor Vehicle Act, 1988.

No. MVR-0321/C.R.41/TRA-2.—Whereas the Ministry of Road Transport and Highways, Government of India has issued the Notification regarding Motor Vehicles (Registration and Functions of Vehicle Scrapping Facility) Rules, 2021 *vide* GSR 653(E) dated 23rd September 2021;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to empower the Transport Commissioner, Maharashtra State as Registration Authority under rule 3(1) of Motor Vehicles (Registration and Functions of Vehicle Scrapping Facility) Rules, 2021 and the Secretary/Principle Secretary/ Additional Chief Secretary of Transport Department as Appellate Authority for the said purpose;

And therefore, in exercise of powers conferred under rule 3(1)(L) of Motor Vehicles (Registration and Functions of Vehicle Scrapping Facility) Rules, 2021, the Government of Maharashtra hereby notifies Transport Commissioner, Maharashtra State as Registration Authority and the Secretary/ Principle Secretary/ Additional Chief Secretary of Transport Department as Appellate Authority under rule 3(1)(B) of said rules.

This notification shall come into effect from the date of its publication in the *Official Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. HOLKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.